ISSN 2394-5303

Issue-41, Vol-03, May-2018

# Printing Area™

International Multilingual Research Journal

Peer-Reviewed

21

Editor

Dr.Bapu G.Gholap

www.vidyawarta.com

7/11

13) छत्रपती शिवाजी महाराजांची शेती व वतनदार विषयक भुमिकाः
प्रा. गणेश पंढरीनाथ भामे, निगडी, पुणे. || 58

14) मराठी कवितेतील मातृप्रतिमा :एक दृष्टिक्षेप
प्रा. मेघा पंढरीनाथ बोरोले, भुसावळ || 62

15) प्रधानमंत्री मुद्रा बॅक योजना एक:दृष्टीक्षेप
डी. जी. चिघळीकर, गडहिंगलज, जि. कोल्हापूर || 63

16) विधिनाट्यातील आयना
डॉ.बी.आर.दहिफळे, उदगीर जि.लातूर. || 66

17) वंचितांचा इतिहास
प्रा.कु.चंद्रकला शालीकराम गजभिये, जि.गडचिरोली || 70

18) तंत्रज्ञानाचा विकास:पत्रकारितेचे बदलते स्वरूप व व्याप्ती
गीतांजली मेघ:श्याम घोलप, पुणे || 71

19) यशवंतराव चव्हाण यांचे परराष्ट्रीय धोरण
प्रा.आर.एस.कोरडे, वरवट बकाल ता.संग्रामपुर || 77

20) पश्चिम विदर्भातील धनगर समाजाची आर्थिक स्थिती
प्रा—डॉ—सुरेश संतराम माळशिखरे,चिखली जि—बुलडाणा || 82

21) पर्यटनातून आर्थिक समृद्धी
डॉ. विठ्ठल भिमराव मातकर, नेकनुर ता.जि. बीड || 85

22) महात्मा गांधी आणि भारतीय लोकशाही
प्रा. कल्पना निंबार्ते, भंडारा. || 89

23) संयुक्त राष्ट्र शांतीसैनिक मोहिमांमध्ये महिलांची वाढती भूमिका
प्रा. सचिन एस. वेरुळकर, तुमसर, भंडारा. || 92

24) ग्रामीण समाजातील महिलांच्या विकासात स्वयं सहाय्यता गटाची भूमिका व प्रभाव——
प्रा. सौ. मेघा मोहन रतकंठीवार, तळोधी (बाळापूर),नागभिड,चंद्रपुर || 97

www.vidyawarta.com/03 — http://www.printingarea.blogspot.com

ISSN: 2394 5303 | Impact Factor 5.011(IIJIF) | Printing Area™ International Research journal | May 2018 Issue-41, Vol-03 | 063

फाटक्या लुगड्याला गाठी बांधून

अंग झाकून घ्यायची.

कवी ना. धों. महानोर यांच्या `आई` कवितेत आई कशी कष्ट उपसायची हे सांगतांना म्हणतात, ना. धों. महानोरांच्या आईच्या काळात जात्यावर बसून घरातील माय माऊल्या दळण दळायच्या कवी महानोर यांचीही आई घरातील लेकराबाळांना, माणसांना भाकरी खायला मिळावी म्हणून भल्या पहाटे नाही तर अपरात्री उठून जात्यावर बसून दळण दळायची. महानोरांची आई दारिद्र्यात जीवन जगत असल्यामुळे अंगावरच्या फाटलेल्या साडीला, लूगड्याला गाठी बांधून घेत होती.

आई खरचं काय असते ?<br>
लेकराची माय असते.<br>
वासराची गाय असते.<br>
दुधाची साय असते<br>
लंगड्याचा पाय असते<br>
धरणीची ठाय असते !

फ. मु. शिंदे त्यांची आई ही कविता वाचक रसिकांनी खूप डोक्यावर घेतली. फ. मु. शिंदे यांच्या कार्यक्रमात श्रोते, रसिक त्यांना आईची कविता म्हणायला लावतात, त्यांच्या कार्यक्रमाची सांगा बहुतांश आई या कवितेनेच होते.

कवी म्हणतो, आई काय असते? तर ती लेकराची माय असते, वासराची गाय असते, दुधावरची साय असते, लंगड्याचा पाय असते आणि धरणीची ठाय असते. अशी ही आई मुलांचा जन्माची शिदोरी असते. ती सरतही नाही आणि उरतही नाही. अशी ही आई एक नाव घरातल्या घरात गजबजलेल गाव असते.

असे कितीतरी मराठी भाषेमध्ये कवी आणि कवयित्री आहेत. त्यांनी आई, जन्मदात्रीच्यावर कविता लिहिल्या आहेत. एका कवी ने तर कल्पना केलेली आहे. `समुद्राच्या पाण्याची शाई व आकाशाचा कागद केला तरी आईची महती, आईची थोरवी, आईची माया लिहिल्या जाणार नाही` अशी ही आई, माय, जन्मदात्री ही ती सरतं ही नाही आणि उरतही नाही. अशी ही आई एक नाव घरातल्या घरात गजबजलेलं गाव असत.

**संदर्भ ग्रंथः-**

१) कवितेतील मातृप्रतिमा - अभ्यासाच्या काही दिशा-संपादन - डॉ. मु. ब. शहा, ज्ञानेश्वर शेंडे, खंड १

२) मराठी कविता:आकलन आणि आस्वाद-डॉ. नागनाथ कोत्तापल्ले

□□□

**15**

# प्रधानमंत्री मुद्रा बॅक योजना एक : दृष्टीक्षेप

**डी. जी. चिघळीकर**

सहा. प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग

कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,

गडहिंगलज, जि. कोल्हापूर

***********

**प्रस्तावना**

देशातील रोजगार निर्मितीमध्ये लघू आणि कुटिर उघोगांचे स्थान अत्यंत महत्वाचे आहे. मोठया उद्योगांच्या माध्यमातून सव्वा कोटी लोकांना रोजगार उपलब्ध होतो, तर लघू-कूटीर च्या माध्यमातून १२ कोटी लोकांना रोजगार उपलब्ध होतो. मोठया उघोगांच्या तुलनेत भविष्यकाळामध्ये लघू–कुटिरघोगामध्ये रोजगार निर्मिती मोठया प्रमाणावर होण्याची जास्त शक्यता आहे. ती निर्माण करण्यासाठी लघू–कुटीरोद्योगांना भांडवल पुरवण्यासाठी गरज लक्षात घेवून प्रधानमत्री नरेंद्र मोदी यांनी मुद्रा बॅक योजनेची घोषणा केली. अर्थमत्री अरूण जेटली यांनी सन २०१५ च्या बजेटमध्ये २० लाख कोटी रू ची तरतूद केली व ८ एप्रिल २०१५ रोजी 'Micro Unit Development Refinance Agency' (MUDRA) बॅकेचे उद्घाटन करण्यात आले. सदर शोध निबंधामध्ये मुद्रा बॅक योजनेचा थोडक्यात आढावा घेवून कर्ज वाटपातील विषमतेचा अभ्यास केला आहे.

**मुद्रा बॅक योजनेचे उदेश**

१) लघू व कुटिरोद्योगांचे सावकारी कर्जावरील अवलबीत्व कमीकरणे व त्यांना मुद्रा बॅक योजने अंतर्गत सहजा–सहजी कर्ज पुरवठा उपलब्ध करून देणे.

२) लघू व कुटीरोद्योजकांना प्रशिक्षीत करणे, त्यांना उद्योग व्यावसाया संबंधीचे सखोल मार्गदर्शन करणे, ज्यामूळे लघू कुटीरोद्योजक आपल्या उद्योग व्यावसायात वाढ करू शकतील.

३) मुद्रा बॅक योजना सुरू करण्याचा मुख्य उदेश स्पष्ट करताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आपल्या भाषणामध्ये स्पष्ट केले की "मोठे उद्योग फक्त सव्वाकोटी लोकाना रोजगार पुरवतात तर लघू–कुटीरोद्योग १२ कोटी इतक्या मोठया प्रमाणात रोजगार पुरवतात. त्यामुळे लघू कुटीरोद्योगाना आर्थिक मदत केली तर जास्त मोठया प्रमाणात रोजगार निर्मीती होवू शकेल ". यासदर्भात ते गुजरातचे उदाहरण देतात की, गुजरात मधील पतंग उद्योगाला थोडी आर्थिक मदत केली तर व्यापारामध्ये ५०० कोटी रू वरून ३५०० कोटी रू पर्यत वाढ झाली.

**मुद्रा बॅक योजनेचे लक्ष**

लघू–कुटीरोद्योगाना बॅका सहजा–सहजी कर्ज उपलब्ध करून देत नाहीत. त्यामूळे लघू कुटीरोद्योजकांना आपल्या उघोग व्यावसायात पाहीजे त्या प्रमाणात वाढ करता येत नाही. ही अडचण लक्षात घेवून मुद्रा बॅक योजना सुरू करण्यात आली आहे. सदर योजनेच्या माध्यमातून शिक्षीत तरूण व युवा वर्गाच्या कलपन्ना व कर्तबगारीला संधी उपलब्ध करू देणे, तसेच त्यांना आर्थिक दृष्टया सक्षम करणे हे मुख्य लक्ष आहे.

**मुद्रा बॅक योजनेसाठी लागणारी पात्रता**

ज्या व्यक्तीच्या नावे एखादा लघू–कुटीरोद्योग आहे किंवा पार्टनरशिप मध्ये एखादा उद्योग आहे व त्या संदर्भातील योग्य कागद पत्रे त्याच्याकडे आहेत अशा सर्व व्यक्तींना मुद्रा बॅक कर्ज योजने अतर्गत कर्ज उपलब्ध होते. या योजेने अतर्गत कर्ज घेताना कोणत्याही प्रकारचा जामीन लागत नाही. कोणत्याही प्रकारच्या तारणची आवश्यकता नाही. स्वत:च्या १०% भाग भांडवलाची गरज नाही. वय वर्ष १८ पूर्ण असावे. अर्जदार कोणत्याही बॅकेचा थकबाकीदार नसावा.

**कर्ज घेण्यासाठी लागणारी कागदपत्रे**

१) ओळखीचा पुरावा म्हणून मतदान ओळखपत्र, आधारकार्ड इ. आवश्यक आहे.

२) रहिवाशी पुरावा म्हणून लाईटबील, घरपावती इ.आवश्यक आहे.

३) व्यवसाय परवाना व कायम स्वरूपी पत्ता.

४) व्यवयायासाठी लागणारे साहित्य किवा यंत्रसामुग्री इ. व त्याचे कोटेशन आणि बिले आवश्यक आहेत.

५) आपण खरेदी केलेल्या मालाच्या व्यापाऱ्याचे पूर्ण नाव व पत्ता.

६) अर्जदाराचे २ फोटो आवश्यक.

७) जातिचे प्रमाणपत्र (SC/ST) करीता आवश्यक.

**मुद्रा बॅक याजने अंतर्गत कर्ज मागणीची प्रक्रिया**

कोणताही भारतीय नागरीक ज्याला स्वत:चा व्यवसाय सुरू करायचा आहे, किंवा आपल्या जुन्या व्यवसायमध्ये वाढ करायची आहे. अशा व्यक्तीनी आपली योग्य कागद पत्रे घेवून जवळील बॅकेमध्ये जावून चौकशी करावी. विहीत नमुण्यातील अर्ज सादर करावा. मुद्रा बॅक योजने अंतर्गत देशातील २७ सार्वजनिक बॅका, १७ खाजगी बॅका, ३१क्षेत्रीय ग्रामीण बॅका व सहकारी बॅका, ३६ मायक्रो फायनान्स सस्था आणि २५ गैर बॅकिग वित्तीय संस्थाच्या माध्यमातून कर्ज उपलब्ध होते.

**कर्ज प्रकार:**

१) शिशु श्रेणीतील कर्ज या प्रकारामध्ये ५०,००० रू इतक्या रक्कमेचे कर्ज वाटप केले जाते.

२) किशोर श्रेणीतील कर्ज या प्रकारामध्ये ५०,००० ते ५,००,००० रू पर्यतचे कर्ज वाटप केले जाते.

३) तरूण श्रेणीतील कर्ज या प्रकारामध्ये ५,००,००० ते १०,००,००० रू इतक्या मोठया रक्कमेचे कर्ज वाटप केले जाते.

**व्याजदर**

सामान्यत: बॅका जेव्हा उद्योग व्यवयासाठी कर्ज देतात तेव्हा त्या कमीत कमी ११% ते जास्तीत जास्त २८% इतक्या मोठया दराने व्याजाची आकारणी करतात. परतू मुद्रा बॅक योजने अंतर्गत आकारल्या जाणाऱ्या व्याजाचा दर ११ ते १८% इतका कमी असतो. कर्ज प्रकारानुसार विचार करता शिशू श्रेणीतील कर्जासाठी १० ते १२%, किशोर श्रेणीतील कर्जासाठी १४ ते १७%, तर तरूण श्रेणीतील कर्जासाठी १६% इतका व्याजदर आकारला जातो. हा व्याजदर बॅकानुसार कमी–जास्त होत असतो.

**मुद्रा बॅक योजना आणि जाती प्रवर्ग**

मुद्रा बॅक योजने अतर्गत केंद्र सरकारने असे स्पष्ट केले आहे की ए अनुसुचित जाती–जमाती, इतर मागास जाती तसेच महीलांना कर्ज वाटपामध्ये

प्राधान्य दिले जाईल. परतू कर्जवाटपाच्या आकडेवारीचा विचार करता तसे झाल्याचे दिसत नाही. कर्ज वाटपामध्ये आरक्षणाची तरतूद केलेली नाही.

**मुद्रा बॅक योजने अंतर्गत कर्ज वाटप**

(दि.८.४.१५ ते दि ८.१२.२०१७)

| प्रवर्ग | शिशू रू. 50,000 | | किशोर रू.50,000 ते 5,00,000 | | तरूण रू. 5,00,000 ते 10,00,000 | |
|---|---|---|---|---|---|---|
| | कर्जवाटप रू. | टक्के | कर्जवाटप रू. | टक्के | कर्जवाटप रू. | टक्के |
| अनुसूचित जाती (SC) | 37,140 | 18% | 6132 | 05% | 2427 | 2.50% |
| अनुसुचित जामाती (ST) | 9598 | 05% | 2840 | 02% | 1222 | 1.25% |
| इतर मागास जाती (OBC) | 68,571 | 34% | 22060 | 17% | 9321 | 9.25% |
| उच्चवर्णीय General | 85,164 | 43% | 96,637 | 76% | 84,023 | 87% |
| एकूण Total | 2,00,473 | 100% | 1,27,669 | 100% | 96994 | 4,25,136 कोटी |

संदर्भ—दै.वृत्तरत्न सम्राट मंगळवार
दि.२७ मार्च २०१८ पेज न.४

वरील तक्त्यातील आकडेवारीनुसार दि.८ डिसेंबर २०१७ पर्यत मुद्रा बॅक योजने अंतर्गत ४,२५,१३६ कोटी रू इतक्या रकमेचे कर्ज वाटप करण्यात आले आहे.

प्रवर्ग निहाय कर्जवाटपाचा विचार करता शिशू योजनेत अनुसुचित जातींना १८%, किशोर योजनेत ५% एतर तरूण योजनेत केवळ २.५% इतके अत्यल्प कर्ज वाटप करण्यात आले आहे. शिशू योजने अंतर्गत ५०,०००रू पर्यतचे कर्ज वाटप केले जाते. यामध्ये ३७,१४० कोटी रू हे प्रमाण बऱ्यापैकी आहे. परतू किशोर योजने अंतर्गत ६१३२ कोटी रू. व तरूण योजने अंतर्गत २४२७ कोटी रू हे प्रमाण अत्यंत कमी आहे.

अनुसुचित जमातीचा विचार करता शिशु योजनेत ५% किशोर योजनेत ०२% व तरूण योजनेत केवळ १.२५% इतके अंत्यत कमी प्रमाण आहे.

इतर मागास जातींचा विचार करता शिशु योजनेत ३४% किशोर योजनेत १७% तर तरूण योजनेत ९.२५% इतके कर्ज वाटप करण्यात आलेले आहे. देशातील OBC ची लोकसंख्या लक्षात घेता हे कर्ज वाटप किती तुटपुंजे आहे हे लक्षात येईल.

खुल्या प्रवर्गाचा अर्थात उच्चवर्णीयांचा विचार करता शिशु योजनेत ४३% किशोर योजनेत ७६% तर तरूण योजनेत ८७% अशा चढत्या दराने कर्जवाटप करण्यात आले आहे.

**निष्कर्ष व शिफारशी**

१) मुद्रा बॅक योजेनेची उदिष्टे, लक्ष, पात्रता, लागणारी कागपत्रे आणि कर्जप्रकार विचारात घेता ही योजना अंत्यत उपयोगी व महत्वाची योजना आहे.

२) मूद्रा बॅक योजनेच्या कर्जावरील व्याजाचा दर हा जास्त आहे .तो अत्यंत कमी असायला हवा.

३) मुद्रा बॅक योजने अंतर्गत वाटप केल्या जाणाऱ्या कर्जाचा विचार करता भेदभाव केल्याचे दिसते. अनुसूचित जाती—जमाती आणि इतर मागास जातींना प्राधान्य देण्याचे आश्वासन दिल्यानूसार कर्ज वाटप झालेले दिसत नाही. याउलट उच्चवर्णीयाना खुल्या प्रवर्गातील लोकांना मोठया प्रमाणात कर्जाचे वाटप करण्यात आलेले आहे.

४) मुद्रा बॅक योजने अंतर्गत कर्जाचे न्याय वाटप होण्यासाठी लोकसंख्याच्या प्रमाणात आरक्षण ठेवून कर्जाचे वाटप करावे.

**संदर्भ:—**

१) WWW.financialservices gov. in. dated 31-03-2018

२) WWW.mudra.org. in dated 31-3-2018

३) अशोक कुमार जाधव, प्रधान मंत्री मुद्रा कर्ज योजनेची फलश्रूती, दै. वृत्तरत्न सम्राट मंगळवार दि.२७ मार्च २०१८ पेज न.४

❑❑❑